पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी-३९
जा.क्र.इक्षेका/४/कावि/२०१ /२०१६
दि. २५/०४/२०१६

**प्रति,**

**मा.----------------------------**
सदस्य/सदस्या इ प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
भोसरी-३९.

**विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची विशेष सभा शुक्रवार दिनांक २९/ ०४ /२०१६ रोजी स.११.०० वाजता आयोजित केलेबाबत.**

**महोदय / महोदया,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची विशेष सभा **शुक्रवार दिनांक २९/ ०४ /२०१६ रोजी स.११.००**वाजता इ क्षेत्रीय कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

सही / -
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
इ प्रभाग समिती

प्रत- १. सर्व संबंधित शाखाप्रमुख
२. कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ प्रभाग समिती
कार्यपत्रिका क्रमांक – १
विशेष सभा

दिनांक- **२९/ ०४ /२०१६** रोजी सकाळी ११.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची विशेष सभा **शुक्रवार दिनांक २९/ ०४ /२०१६ रोजी स.११.००** वाजता इ क्षेत्रीय कार्यालयातील **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

**विषय क्रमांक-१-** मा.क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील पत्र क्र.जा.क्र.इक्षे/०२/कावि /४०१/२०१६, दिनांक २५/०४/२०१६.

**विषय** – प्रभाग क्र. ३२ सॅण्डवीक कॉलनी व प्रभाग क्र. ३४ गव्हाणेवस्ती हगणदारी मुक्त घोषीत करणेसंबंधी विशेष क्षेत्रीय सभेचे आयोजन करणेबाबत.

केंद्रशासनाने देशातील सर्व शहरामधील नागरीकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळणे याकरीता शहरांना स्वच्छतेची सवय व शहरातील सर्व नागरीकांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देणेचे ध्येय गाठण्यासाठी दिनांक २/१०/२०१४ पासून स्वच्छ भारत अभियान (नागरी) संपूर्ण देशामध्ये राबविण्याची घोषणा केलेली आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने देखील पत्र क्र. स्वभाअ/२०१५/प्रक्र.२३/नवि/३४, दिनांक १५/५/२०१५ अन्वये केंद्र शासनाचे धर्तीवर स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) राबविण्याचे ठरवून दिनांक २/१०/२०१७ पर्यंत हगणदारी मुक्त (Open Defecation Free) शहरे करण्याचे उद्दिष्ट निश्चीत केलेले आहे. तसेच मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र. मातवी/१२/कावि / ९६/ २०१६ दिनांक १/४/२०१६ अन्वये दिनांक २/१०/२०१७ पुर्वी टप्प्या टप्प्याने पिंपरी चिंचवड शहर हगणदारी मुक्त करण्याचे उद्दिष्ट निश्चीत केलेले आहे. त्या अनुषंगाने इ क्षेत्रिय कार्यालय कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र. ३२ सॅण्डविक कॉलनी व प्रभाग क्र. ३४ गव्हाणे वस्ती हे दोन प्रभाग दि. ३०/४/२०१६ पूर्वी हगणदारी मुक्त (Open Defecation Free) घोषित करणेसंबंधी इ क्षेत्रिय कार्यालयाची विशेष क्षेत्रिय सभेचे दि. २९/४/२०१६ पूर्वी आयोजन करणे आवश्यक आहे. तरी त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करणेत यावी.

------

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
इ प्रभाग समिती

जा.क्र.इक्षेका/४/कावि/ २०१ /२०१६
दि. २५/०४/२०१६